ISSN–2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

हिंदू कोड बिल आणि स्त्रियांचे सक्षमीकरण

प्रतिभा जयवंत जाधव.

Ph.D. Scholar, *अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई - २०.*

गोषवारा :

'राज्यघटनेपेक्षा हिंदू कोड बिल महत्त्वाचे आहे', असे स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घोषित केले होते. हिंदू कोड बिलामुळे संपूर्ण देशाला 'निश्चित, एकसूत्र आणि सुगम्य' कायदा मिळणार होता. एकूणच हिंदू कोड बिल म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने उचललेले महत्त्वाचे पाऊल होते. परंतु सनातनी समाजाने त्यांना प्रचंड विरोध केला. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीदेखील 'हिंदू कोड बिल' नामंजूर केले. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पुढे हे बिल टप्प्याटप्प्याने पास केले गेले आणि स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळाले. परंतु आजही स्त्रियांना हिंदू कोड बिलाबद्दल माहिती असलेली दिसत नाही.

कळ शब्द : *डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, स्त्रियांच्या सक्षमीकरणात हिंदू कोड बिलाचा सिंहाचा वाटा, हिंदू कोड बिल विषयी स्त्रियांमधील जागरूकता.*

Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलविषयक कार्याचे अध्ययन करणे.
- हिंदू कोड बिलाची स्त्रियांच्या सक्षमीकरणातील भूमिका अभ्यासणे.
- हिंदू कोड बिलविषयक सामाजिक जागृतीसाठी शिफारशी सुचविणे.

गृहितके :

- स्त्रियांच्या सक्षमीकरणास हिंदू कोड बिल साहाय्यभूत ठरले.
- स्त्रियांना हिंदू कोड बिलविषयी माहिती नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम आणि प्राथमिक स्त्रोतांच्या आधारे आवश्यक ती माहिती संकलित करण्यात आली आहे.

अ] स्थूल पातळीवरील विश्लेषण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित साहित्य ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शासनाने प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य, विविध संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, वृत्तपत्रे, संशोधन लेख, विविध संकेत स्थळे, इत्यादी अशा विविध

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

स्त्रोतांच्या माध्यमातून अभ्यासाकरीता आवश्यक असणारी दुय्यम स्वरूपाची माहिती संकलित करण्यात आली आहे.

ब] सूक्ष्म पातळीवरील विश्लेषण

- हिंदू कोड बिल आणि स्त्रियांचे सक्षमीकरण अभ्यासण्यासाठी एकूण ३५४ स्त्रियांचा यादृच्छिक पद्धतीने नमुना निवडला आहे.
- अभ्यासाकरिता आवश्यक असणारी प्राथमिक स्वरूपाची आधारसामुग्री संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे.
- वैयक्तिक व सामुहिक मुलाखतींच्या आधारे प्रश्नावली भरून घेण्यात आल्या आहेत.
- अभ्यासाच्या आवश्यकतेनुसार संकलित माहितीचे वारंवारितेनुसार, वयानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.
- उपयुक्त संख्याशास्त्रीय साधने आणि तंत्रांचा वापर करून संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.
- विश्लेषणामध्ये सहजता यावी याकरिता स्तंभालेख व वर्तुळाकृती आलेखांचा देखील वापर करण्यात आला आहे.

प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी मूलभूत कार्य केले आहे. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. केवळ प्रबोधन आणि लेखन व भाषणे यातून स्त्रियांचा विकास होणार नाही, तर स्त्रियांना कायदेशीर तरतुदी, हक्क आणि अधिकार देणे गरजेचे आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाणून होते. तिला 'सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य एका विशेष कायद्याने द्यावे', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात होते. म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला होता. स्त्रियांच्या सक्षमीकरणात हिंदू कोड बिल महत्वाची भूमिका बजावते यावर मी माझ्या 'हिंदू कोड बिल आणि स्त्रियांचे सक्षमीकरण' या प्रस्तुत शोधनिबंधांमध्ये प्रकाश टाकणार आहे.

मुख्य विषय :

१. **हिंदू कोड बिलाची पार्श्वभूमी**

ब्रिटीश राजवट कायद्याच्या दृष्टीने सुधारणेच्या मार्गावर राहिली होती. इ. स. १८०२ चा बालहत्या प्रतिबंधक कायदा, इ. स. १८२९ चा सतीबंदीचा कायदा, इ. स. १८५० चा धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा, इ. स. १८५६ चा विधवा विवाहाचा कायदा, इ. स. १८६६ चा धर्मांतरितांच्या विवाह विच्छेदाचा कायदा, इ. स. १८७२ चा विशिष्ट विवाहाचा कायदा, इ. स. १८९१ चा संमती वयाचा कायदा, इ. स. १९२८ चा वारसा हक्कासंबंधीचा कायदा, इ. स. १९२९ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि इ. स. १९३७ चा हिंदू स्त्रीच्या मालमत्तेच्या हक्काचा कायदा, इत्यादी असे अनेक कायदे ब्रिटिश राजवटीत करण्यात आले होते. यांपैकी बरेचसे कायदे स्त्रियांना न्याय मिळवून देणारे होते.

इ. स. १९३७ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात मांडलेला 'हिंदू स्त्रीच्या मालमत्तेच्या हक्काचा कायदा' अत्यंत भोंगळ

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

आणि त्रोटक आहे अशी त्यावर टीका झाली. हा दोष दूर करण्यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय देण्यात आला.[१]

मध्यवर्ती सरकारने न्यायमूर्ती सर बेनेगल नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली २५ जानेवारी १९४८ रोजी 'दि हिंदू कोड कमिटी' नेमली. या कमिटीने 'कायद्यात सुधारणा करण्याऐवजी नवीन हिंदू कोड तयार करावे' असे सुचविले. त्याप्रमाणे नवीन हिंदू कोड १९४२ मध्ये गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले. परंतु सर बेनेगल नरसिंहराव यांच्या 'दि हिंदू कोड कमिटी'ला सनातन्यांनी कडाडून विरोध केला. सर बी. एन. राव यांच्या सिलेक्ट कमिटीने अनुकूल-प्रतिकूल सारासार विचार करून अहवाल व मुद्द्यांवर आधारित हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार केला व हे बिल ११ एप्रिल १९४७ रोजी जोगेन्द्रनाथ मंडल यांनी लोकांपुढे विचारार्थ मांडले.[२]

पुढे ३ ऑगस्ट १९४७ रोजी भावी स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळातील पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती झाली आणि निर्णयासाठी हे बिल त्यांच्यापुढे मांडण्यात आले. अभ्यासू व चिकित्सक वृत्तीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची पुनर्बांधणी करून १२ ऑगस्ट १९४८ रोजी कायदे मंडळासमोर सादर केले. हिंदू आचार धर्मातले जे भाग अगदी पडायला आले आहेत त्यांची दुरुस्ती करण्यापलीकडे या बिलात दुसरे काहीही नाही.[३] असे स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते.

२. हिंदू कोड बिल आणि स्त्रियांच्या हक्कांची सनद

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जनतेला न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांची लेखी हमी दिली होती. ती हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांच्या बाबतीत प्रत्यक्षात येणार होती. सामाजिक असमानता, भेदभाव, विषमता पसरविणाऱ्या आणि स्त्रियांना बंदिस्त करून ठेवणाऱ्या चालीरितींवर 'हिंदू कोड बिल' प्रहार करणार होते. हिंदू कोड बिलाच्या मसुद्यावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी आपले मत मांडताना ते म्हणतात, 'समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आहे आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजप्रासाद बांधण्यासारखे आहे.' हिंदू कायद्यांच्या संहतीकरणाविषयीच्या विधेयकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखी अनन्यसाधारण महत्त्व होते. 'हिंदू कोड बिल' हे सर्व जाती, संप्रदाय, वीरशैव, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राह्मण, लिंगायत, बौद्ध, जैन आणि शीख या सर्वांनाच लागू करण्यात आले होते. हिंदू कोड बिलान्वये एकंदरीत पाच प्रकारच्या सुधारणा सुचविल्या आहेत. त्या

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

पुढीलप्रमाणे-

- **विवाह व दत्तक** :- नव्या कायद्याने जातीची बंधने नाहीशी करून कोणत्याही जातीत विवाह व दत्तक घेण्यास संमती दिली.
- **एकपत्नीत्व** :- नवीन कायद्याने एका हिंदूस फक्त एक बायको करण्याची संमती दिली.
- **घटस्फोट** :- नवीन कायद्याने काही ठराविक अटींवर नवरा बायकोस काडीमोड मिळण्याची संमती दिली.
- **मिताक्षरा पद्धतीचा पुरस्कार** :- नवीन कायद्याने दायाभाग पद्धतीला प्रतिबंध करून मिताक्षरा पद्धतीचाच अवलंब करण्याची संमती दिली.
- **स्त्रीधन व वारसाहक्क** :- नवीन कायद्याने लग्नाच्या वेळी बक्षीस मिळालेले पैसे व दागिने हे स्त्रीधन राहील व वडिलांच्या संपत्तीत मुलाप्रमाणेच मुलींचा समान वाटा राहील. अशी संमती दिली.

पुरातन हिंदू भेदभावाच्या संकल्पनांचा त्याग करून आधुनिक प्रगत व पुरोगामी विचारसरणीला अनुसरून समाजव्यवस्थेची पुनर्बांधणी करणे, हे हिंदू कोड बिलाचे इप्सित होते.

हिंदू कोड बिलातील :-

- विवाहाचा कायदा तिची बालविवाहापासून मुक्ती करणार होता. तिला अध्ययनासाठी प्रवृत्त करणार होता. स्वतःच्या पसंतीने विवाह करण्यास ती मुक्त होती.
- एकपत्नीत्वाच्या कायद्यामुळे पती उगीचच आपल्याला टाकून देणार नाही असा विश्वास तिला संसार करण्याचे व कौटुंबिक निर्णयात सहभागी होण्याचे बळ देणार होता. तिचा आत्मविश्वास वाढविणार होता.
- घटस्फोटाचा कायदा तिला नको असलेले नाते तोडण्यास संमती देणार होता. घटस्फोटानंतर पोटगीचा अधिकार काही प्रमाणात आर्थिक विवंचनेतून तिला मुक्त करणार होता.
- मिताक्षरा पद्धतीमुळे वडिलांच्या संपत्तीत तिला अधिकार मिळणार होता आणि स्त्रीधन व वारसाहक्क याद्वारे जर तिचे स्वतःचे दागिने, पैसे असतील तर तिचा स्वतःचा संपूर्ण अधिकार राहणार होता.
- या संपत्तीचा वारसदार ठरवण्याचा अधिकारही प्राप्त होणार होता.

हिंदू कोड बिलाचा अजून एक नावीन्यपूर्ण भाग म्हणजे स्त्रियांना लग्नात दिला जाणारा हुंडा. ज्यावर सासरचे लोक मालकीहक्क दाखवितात. तो स्त्रीधन म्हणून घोषित केला गेला.

असे हे हिंदू कोड बिल म्हणजे स्त्रियांच्या मुक्तीचा मार्ग होता. त्यामुळेच ती खंबीर होणार होती. त्याची जाणीव जेव्हा पुरुषाला झाली असती तेव्हा त्याने स्वतःहून तिचे शोषण करणे थांबवले असते. तिचा त्याला धाक वाटला

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

असता. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा दूरदृष्टीकोन सर्वसामान्यांच्या लक्षात आला नाही.

३. सनातन्यांनी हिंदू कोड बिलाला केलेला विरोध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका

सनातन्यांकडून आणि पुरुषी वर्चस्वाखाली असलेल्या स्त्रियांकडून 'न भूतो न भविष्यती' असा विरोध हिंदू कोड बिलाला केला गेला. या विरोधकांत तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादही होते. बिल पास झाले तर त्यांनी राजीनामा देण्याची धमकी दिली होती. संकेश्वर पिठाचे श्रीमत जगद्गुरू स्वामी जेरेशास्त्री यांनी तर हिंदू कोड बिलाच्या विरोधात दौरेच काढले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नामोहरम करण्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैयक्तिक जीवनावरही अत्यंत गलिच्छ शब्दांत टीका केली. "आंबेडकर विद्वान आहेत, त्यांचा धर्मशास्त्राचा अभ्यास आहे असे म्हणतात. पण ते अंत्यज आहेत. आंबेडकरांच्या नाल्यातून आलेली धर्मशास्त्राची गंगा पवित्र कशी असणार? मोरीतून आलेल्या दुधासारखी ती त्याज्य आहे." स्वामी जेरेशास्त्र्यांचे हे भाष्य समस्त सनातन्यांच्या विकृत मनाची साक्ष देते.[४] या टीकेला प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी १६ फेब्रुवारी १९५० रोजी जाहीर सभेत पुढील प्रत्युत्तर दिले- "अत्यंत प्रखर बुद्धीचे घटनातज्ञ व महान विद्वान म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दुनिया ओळखते परंतु काही दिवसांपूर्वी डॉ. आंबेडकरांवर गलिच्छ टीका करणारे जेरेशास्त्री कोठले कोण हे कुणालाच माहीत नाही. आंबेडकरांच्या विद्वत्तेला गटारातून येणाऱ्या गंगोदकाची उपमा देणाऱ्या जेरेशास्त्र्यांस सांगावेसे वाटते की, जेरेशास्त्र्यांसारख्या प्रतिगामी लोकांच्या गटारी विचारांनादेखील पावन करण्याचे पावित्र्य डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेत आहे."[५]

स्वामी करपात्री यांनी लोकांना एकत्र करून चुकीचे समज करून देऊन भडकावण्याचा प्रघात सुरू केला. ते सांगत सुटले की, 'हिंदू कोड बिलात सख्ख्या बहिण-भावाच्या लग्नाला मंजुरी दिली आहे. सर्वसामान्यांना हे पापकृत्य कळू नये म्हणून हिंदू कोडे बिल हिंदी आणि उर्दू भाषेत न छापता केवळ इंग्रजी भाषेत छापले आहे. हा आंबेडकरांचा कट आहे.' या आरोपाला उत्तर म्हणून कायदेमंडळातील अनुवादक पं. सोहनलाल शास्त्री यांच्याकडून डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाचा हिंदी व उर्दू भाषेत अनुवाद करून घेतला. स्वामी कारपात्रींनी पसरविलेला समज दूर व्हावा म्हणून या अनुवादाच्या १० हजार प्रति छपून काढल्या आणि विविध संस्था, प्रमुख व्यक्ती आणि सर्वसामान्यांना वाटल्या. अशाप्रकारे त्यांनी सनातन्यांचा विरोध सडेतोडपणे हाणून पाडला, त्यांचे पितळ उघडे पडले तरी हिंदू कोड बिलाला असलेला सनातन्यांचा विरोध कमी झाला नाही. इतकेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जीवे मारण्याच्याही धमक्या येऊ लागल्या. पण या 'प्रज्ञासूर्याने' कोणत्याही धमकीला भीक घातली नाही. त्यांनी हिंदूंच्याच पवित्र ग्रंथांतील योग्य दाखले देऊन, पुरावे देऊन,

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

भाषणांमधून बिलाचे समर्थन करण्यास सुरुवात केली. मूळ हिंदू स्मृतींमध्येच 'मुलींचा वडिलांच्या मालमत्तेत हक्क असणे, विधवा विवाहास मान्यता असणे' वगैरे श्लोक 'पंडित धर्मदेव विद्यालंकार' यांना पाच हजार रुपये देऊन त्यांच्याकडून शोधून काढून ते 'विरार्जून समाचार' पत्रामधून लेखमालेच्या स्वरूपात प्रकाशित केले.[६] तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महिला काँग्रेसनेदेखील 'बिल समर्थक प्रचार' करण्यास सुरुवात केली. तथापि त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. २६ सप्टेंबर १९५१ रोजी पंडित नेहरूंनी या बिलाला स्थगिती दिली आणि हे सहन न झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१ ला आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. स्त्रियांच्या हक्कांसाठी जीवाची पर्वा न करता भांडणारा, तळमळीने लढणारा आणि त्यासाठी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देणारा दुसरा नेता जगाच्या पाठीवर शोधून सापडणार नाही. राजीनाम्यानंतर अत्यंत उद्विग्न मनःस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "स्त्रियांची ही मानसिक दुर्बलता आहे. त्यांच्या या दुर्बलतेमुळे या बिलाचा घात झाला. त्यांच्या पायात ताकद असती तर बिल कधीच बारगळले नसते. पार्लमेंटमध्ये निवडून आलेल्या स्त्रियांनीदेखील या बिलाबाबत काहीही जागरूकता दाखवली नाही. एखाद्या स्त्रीने दुधाचे विरजण घालून ठेवावे आणि तिला ते विरजण शेवटी नासलेले दिसावे. तशीच स्थिती माझ्या हिंदू कोड बिलाची झाली."[७] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाजाने तर नाहीच पण स्त्रियांनीही साथ दिली नाही.

४. हिंदू कोड बिलास मंजुरी

पुढे या बिलाच्या खंडशः मंजुरीसाठी हरिभाऊ पाटसकर या ब्राह्मण महाराष्ट्रीयन व्यक्तीची निवड करण्यात आली. बिल खंडश: पास झाले.[८] हिंदू कोड बिलाचे महत्त्व लक्षात घेऊन काही भाग मंजूर करण्यात आला. १९५५ विशेष विवाह कायदा, १९५५ हिंदू विवाह कायदा, १९५६ हिंदू उत्तराधिकार कायदा, १९५६ हिंदू ग्रहण आणि निर्वाह कायदा या वेगवेगळ्या कायद्यांच्या स्वरूपात हिंदू कोड बिलाच्या तरतुदीत बराच फेरबदल करून वरील कायदे पास करण्यात आले.[९]

५. गृहितकांची पडताळणी

प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्यात आलेल्या गृहितकांची पडताळणी करण्यासाठी मी एक सर्वेक्षण केले. अभ्यासाच्या आवश्यकतेनुसार माहिती संकलित करताना विवाहाचे वय, घटस्फोट, कौटुंबिक निर्णयातील सहभाग, स्त्रियांची संपत्ती/मालमत्ता, स्त्रीधन इत्यादी बाबी विचारात घेतल्या आहेत.

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

गृहितक-१ले : स्त्रियांच्या सक्षमीकरणास हिंदू कोड बिल साहाय्यभूत ठरले.

५.१ उत्तरदात्यांचा वयानुसार वैवाहिक दर्जा

वयोगट	विवाहित	अविवाहित	विधवा	घटस्फोटीत
१८-३०	५५.१%	४२.७%	०.०%	२.२%
३१-६०	८४.५%	५.८%	९.०%	०.८%
६१च्या पुढे	७६.२%	०.०%	२३.८%	०.०%

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण

कोष्टक क्र. ५.१ वरून असे निदर्शनास येते की, वयोगट ३१-६० या वर्गातील एकूण उत्तरदात्यांपैकी ८४.५% उत्तरदात्या विवाहित आहेत. परंतु, वयोगट १८-३० या वर्गातील एकूण उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ४२.७% उत्तरदात्या अविवाहित आहेत. म्हणजे स्त्रियांची विवाहवयाची १८ वर्षे ही किमान वयोमर्यादा उलटून गेल्यावरही जास्तीतजास्त स्त्रिया अविवाहित आहेत.

५.२ उत्तरदात्यांचे कुटुंबातील निर्णयाच्या सहभागानुसार वर्गीकरण

उत्तरदात्यांचा कौटुंबिक निर्णयात सहभाग	टक्केवारी
होय	९४.९%
नाही	५.१%

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण

कोष्टक क्र. ५.२ वरून असे निदर्शनास येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी कौटुंबिक निर्णयात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९४.९% आहे. तर अजूनही कौटुंबिक निर्णयात सहभागी करून घेतले जात नसलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५.१% एवढे आहे.

५.३ उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न आणि उत्तरदात्याची मालमत्ता / संपत्तीचे मूल्य याचा तुलनात्मक अभ्यास

उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न आणि मालमत्ता / संपत्तीचे मूल्य (रूपयांत)	उत्पन्न टक्केवारी	मालमत्ता /संपत्ती टक्केवारी
१ लाखापेक्षा कमी	२२.९%	३१.१%
१ ते ५ लाखांपर्यंत	३५.०%	२४.३%
५ ते १० लाखांपर्यंत	१६.९%	१२.४%
१० ते ५० लाखांपर्यंत	६.८%	१६.४%

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

५० ते १ करोडपर्यंत	०.३%	६.८%
१ करोडच्या वर	-	७.६%
Na	१८.१%	१.४%

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण



आलेख क्र. १ उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न आणि मालमत्ता /संपत्तीचे मूल्य (रूपयांत)

आलेख क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, स्त्रियांचे वार्षिक उत्पन्न आणि मालमत्ता/संपत्ती यात फार तफावत आहे. १ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या २२.९% उत्तरदात्या आहेत. परंतु १ लाखापेक्षा कमी मालमत्ता/संपत्ती असणाऱ्या ३१.१% उत्तरदात्या आहेत. ५० लाख ते १ करोडपर्यंत उत्पन्न असणाऱ्या केवळ ०.३% उत्तरदात्या आहेत. परंतु ५० लाख ते १ करोडपर्यंत मालमत्ता/संपत्ती असणाऱ्या ६.८% उत्तरदात्या आहेत. १ करोडच्या वर वार्षिक उत्पन्न असणारी एकही उत्तरदाती नाही परंतु ७.६% उत्तरदात्यांकडे १ करोडच्यावर मालमत्ता आहे. १८.१% उत्तरदात्यांना वार्षिक उत्पन्नाचा प्रश्न लागू होत नाही (काहीही उत्पन्न नाही) परंतु केवळ १.४% उत्तरदऱ्यांना मालमत्ता/संपत्तीचा प्रश्न लागू होत नाही म्हणजेच केवळ १.४% स्त्रिया वगळता बाकी स्त्रिया मालमत्तेच्या अधिकारी आहेत

५.४ उत्तरदात्यांचे बँकेमध्ये बचत खाते आहे का?

उत्तरदात्यांचे बँकेमध्ये बचत खाते आहे का	टक्केवारी
होय	८९.५%
नाही	१०.५%

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण

कोष्टक क्र. ५.४ वरून असे निदर्शनास येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी ८९.५% उत्तरदात्यांचे बँकेत बचत

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

खाते आहे. १०.५% उत्तरदात्यांचे बँकेत बचत खाते नाही.

५.५ उत्तरदात्यांचे बचत खात्यांच्या प्रकारानुसार वर्गीकरण

बचत खात्याचा प्रकार	टक्केवारी
वैयक्तिक खाते	६७.५%
संयुक्त खाते	४.२%
वैयक्तिक आणि संयुक्तखाते	१७.८%

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण



आलेख क्र. २ उत्तरदात्यांच्या बचत खात्याचा प्रकार

आलेख क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, बँकेत खाते असणाऱ्या एकूण उत्तरदात्यांपैकी ६७.५% उत्तरदात्यांचे बँकेत वैयक्तिक बचत खाते आहे. ४.२% उत्तरदात्यांचे बँकेत संयुक्त बचत खाते आहे. तसेच वैयक्तिक आणि संयुक्त असे दोन्ही प्रकारचे बचत खाते असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १७.८% आहे. १०.५% उत्तरदात्यांचे बँकेत कोणत्याही प्रकारचे खाते नाही.

वरील उपलब्ध माहितीनुसार स्त्रियांच्या शैक्षणिक, वैचारिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक सक्षमीकरणास हिंदू कोड बिल साहाय्यभूत ठरले, हे सिद्ध होते.

५.५ उत्तरदात्यांचे बचत खात्यांच्या प्रकारानुसार वर्गीकरण

बचत खात्याचा प्रकार	टक्केवारी
वैयक्तिक खाते	६७.५%
संयुक्त खाते	४.२%
वैयक्तिक आणि संयुक्तखाते	१७.८%

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

स्त्रोत: प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण



आलेख क्र. २ उत्तरदात्यांच्या बचत खात्याचा प्रकार

आलेख क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, बँकेत खाते असणाऱ्या एकूण उत्तरदात्यांपैकी ६७.५% उत्तरदात्यांचे बँकेत वैयक्तिक बचत खाते आहे. ४.२% उत्तरदात्यांचे बँकेत संयुक्त बचत खाते आहे. तसेच वैयक्तिक आणि संयुक्त असे दोन्ही प्रकारचे बचत खाते असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १७.८% आहे. १०.५% उत्तरदात्यांचे बँकेत कोणत्याही प्रकारचे खाते नाही.

वरील उपलब्ध माहितीनुसार स्त्रियांच्या शैक्षणिक, वैचारिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक सक्षमीकरणास हिंदू कोड बिल साहाय्यभूत ठरले, हे सिद्ध होते.

<u>गृहितक-२रे</u> : <u>स्त्रियांना हिंदू कोड बिलविषयी माहिती नाही.</u>

.६ उत्तरदात्यांना हिंदू कोड बिलाविषयी माहिती आहे काय?

हिंदू कोड बिलाविषयी माहिती आहे काय	टक्केवारी
होय	२४.६%
नाही	७५.४%

स्त्रोत:प्राथमिक माहितीचे सर्वेक्षण



आलेख क्र. ३ उत्तरदात्यांना हिंदू कोड बिलाविषयी माहिती

ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

आलेख क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी २४.६% उत्तरदात्यांना हिंदू कोड बिलाविषयी माहिती आहे. तर ७५.४% उत्तरदात्यांना हिंदू कोड बिलाविषयी माहिती नाही.

मोठ्या प्रमाणात स्त्रियांना हिंदू कोड बिलविषयी माहिती नाही, हे उपलब्ध आकडेवारीवरून सिद्ध होते.

निष्कर्ष :

- **विवाह :** विवाह कधी करावा कोणाशी करावा याविषयीची बंधने आता सैल झाली आहेत.
- **घटस्फोट आणि पोटगी :** विवाहित स्त्रियांपैकी घटस्फोट घेणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी अत्यंत कमी आहे. हिंदू कोड बिलांतर्गत स्त्रियांना घटस्फोटाचा तसेच पोटगीचा अधिकार देण्यात आला आहे. लग्नानंतर पूर्णपणे नवऱ्यावर अवलंबून असणाऱ्या स्त्रियांना घटस्फोटानंतर नवऱ्याकडून पोटगीच्या स्वरूपात उदरनिर्वाहासाठी विशिष्ट रक्कम मिळते. यामुळे घटस्फोटानंतरही स्त्रियांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत नाही.
- **वारसाहक्क आणि स्त्रीधन :** उत्पन्न नसतानाही मालमत्ता/संपत्ती बाळगणाऱ्या उत्तरदात्यांना ही संपत्ती वारसाहक्काने किंवा पतीच्या संपत्तीत हिस्सा म्हणून मिळाली असणार हे उघड आहे. हिंदू कोड बिलातील वारसाहक्क, स्त्रीधन या तरतुदींमुळे स्वतःचे उत्पन्न काहीही नसतानाही स्त्रिया मालमत्ता किंवा संपत्तीच्या अधिकारी ठरल्या. तसेच बँकेत वैयक्तिक खाते असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे. स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबित्व यातून सिद्ध होते. स्वतःचे उत्पन्न असूनही वैयक्तिक खाते नाही. संयुक्त खात्यामध्ये पतीचाच हस्तक्षेप जास्त. अशी काही किरकोळ उदाहरणे वगळता स्त्रिया बऱ्याच प्रमाणात आर्थिकदृष्ट्या सबळ झाल्या आहेत.
- **दत्तकविधान आणि वारसदार :** कौटुंबिक निर्णयात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊ शकणारी स्त्री स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास निश्चितच समर्थ आहे. दत्तक घेण्याचा अधिकार तिला आहे तसेच आपल्या संपत्तीचा वारसदार ठरविण्याचा अधिकारही हिंदू कोड बिलाने तिला मिळवून दिला आहे.
- **स्त्रियांचे सक्षमीकरण :** हिंदू कोड बिलातील तरतूदी व कायद्यांमुळे स्त्रियांचे नक्कीच सक्षमीकरण झाले आहे. निर्णय स्वातंत्र्य आणि आर्थिक अधिकार यामुळे स्त्रिया खंबीर बनत आहेत. समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे त्यांना शक्य होत आहे. एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रीकडे पहिले जाते. स्त्रियांचा समाजिक दर्जा उंचावत आहे.
- **हिंदू कोड बिलाविषयी अज्ञान :** हिंदू कोड बिलाविषयी उत्तरदात्यांमध्ये कमालीचे अज्ञान दिसून आले. आपण उपभोगत असलेले स्वातंत्र्य, हक्क याचा कर्ता-करविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत याची त्यांना जाणीव नाही. स्त्रियांसाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या योगदानाची, बलिदानाची स्त्रियांना सखोल माहिती नाही. इतकेच काय, उच्च शिक्षित तसेच वकिली करणाऱ्या स्त्रियांनाही हिंदू कोड बिलाविषयी माहित नाही. हे थक्क करणारे आहे. अशा स्थितीत या बाबतीत सामान्य स्त्रियांकडून अपेक्षा करणेही चुकीचे आहे

शिफारशी :

- स्त्रियांमध्ये हिंदू कोड बिलविषयी जागृतता येण्याकरिता या विषयासंबंधित कार्यशाळा आयोजित करणे गरजेचे आहे.

- प्रसारमाध्यमांमधून हिंदू कोड बिलाविषयी तज्ञांचे परिसंवाद आयोजित करावे.
- लहान लहान पुस्तिकांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू कोड बिलाचा लढा, स्त्रियांचे हक्क व अधिकार असे विषय प्रकाशित करावे.
- शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदू कोड बिलाचे महत्त्व, स्त्रियांसाठीचे कायदे असे विषय समाविष्ट केले जावे.

समारोप :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाला सनातन्यांकडून प्रचंड विरोध झाला असला तरी पहिल्या लोकसभा निवडणुकीनंतर हे बिल संसदेत मंजूर करण्यात आले. यामधूनच या बिलाचे महत्त्व लक्षात येते. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चारही कायदे वेगवेगळ्या वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले. हे कायदे मंजूर होणे म्हणजे कायद्याच्या इतिहासातली एक क्रांतिकारक घटना होय. या कायद्यांनी भारतीय स्त्रियांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायदेशीर समानता प्रस्थापित केली. सध्याच्या काळातील स्त्री ही 'जागृत स्त्री' आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घडामोडींविषयी ती बऱ्याच प्रमाणात जागृत आहे. आपले कायदेशीर हक्क व अधिकार याबाबत ती सजग असून ते मिळविण्याबाबत ती कार्यशील असलेली दिसते. एकूणच स्त्रियांच्या सर्वांगीण सक्षमीकरणात हिंदू कोड बिल मैलाचा दगड ठरले.

<u>संदर्भसूची</u> :-

डॉ. सूर्या अनिल, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ. क्र. ८९.

उपरोक्त, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, पृ. क्र. ९०.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, १९४६ ते १९५६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती, २००२, पृ. क्र. १४८.

उपरोक्त, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, पृ. क्र. १०२.

उपरोक्त, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, पृ. क्र. १०२-१०३.

पवार उर्मिला व मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री-उवाच प्रकाशन, प्रथमावृत्ती, पृ. क्र. ९४.

उपरोक्त, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, पृ. क्र. १०५.

उपरोक्त, आम्हीही इतिहास घडविला, पृ. क्र. ९५.

उपरोक्त, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल, पृ. क्र. २२.

ISSN–2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

इतर संदर्भ साधने :-

Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol. 14, Part One, Education Department Government of Maharashtra, 1995.

Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol. 14, Part Two, Education Department Government of Maharashtra, 1995.

शास्त्री सोहनलाल, हिंदू कोड बिल और डॉ. आंबेडकर, सोहनलाल शास्त्री, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम आवृत्ति, २०१८.

Singh Nutan, Dr. B.R. Ambedkar and his Contribution in Women's Empowerment, Writers world, New Delhi, First Edition, 2015.